# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०३/२०२४ (शुक्रवार) सकाळ**

---

## मोटरसायकल चोरी करणारे अट्टल गुन्हेगार नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

फिर्यादी नामे — आकाश अशोक सवईकार, वय २९ वर्ष रा. मंगलधाम कॉलनी वृषभ विहार प्लाट नं २४ तह. जिल्हा अमरावती अंकीता हाईटस ५०४ सातगाव तह. हिंगणा जि. नागपुर यांनी दिनांक १९/०३/२०२४ रोजी पो. स्टे ला हजर येवून तोंडी रिपोर्ट दिला की, माझी होन्डा कंपनिची शाईन मो.सा. क्र. एम.एच. २७ ए.झेड. ५२९७ किंमती ४०,०००/— रू. ची कुणीतरी अज्ञात चोराने दि. १७/०३/२०२४ चे ००.३० वा. ते ११.०० वा. दरम्यान अंकिता हाईटस अपार्टमेंट ची खालील पार्कींग मधुन चोरून नेली आहे. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद असुन तपासावर आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये अनोळखी आरोपीचा शोध घेणे कामी वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक गठीत करून अनोळखी आरोपीचा शोध घेणे सुरू केले. गठीत पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गोपनिय मुखबिर पेरून गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेत असतांना मुखबीर द्वारे मिळालेल्या माहीती वरून मौजा बोरखेडी फाटक शिवार ओव्हरब्रिजचे खाली झोपुन असलेला आरोपी नामे— पप्पु उर्फ ख्वाजा राशिद शेख, रा. महगाव कस्बा वार्ड नं. ४ मेहबुब पठाण यांच्या घरी ता. दारव्हा जि. यवतमाळ यास गुन्हया संबंधाने विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. यावरून वरील नमुद आरोपीस सदर गुन्हयात अटक करण्यात आली व सदर आरोपी हा अट्टल मोटरसायकल चोर असल्याने त्याचा मा. न्यायालयाकडुन ३ दिवस पी सी आर घेऊन पी सी आर दरम्यान सदर आरोपीने या गुन्हयाव्यतिरीक्त पोस्टे बुट्टीबोरी व पोस्टे एम आय डी सी बुट्टीबोरी येथे नोंद असलेल्या गुन्हयातील मोसा चोरी केल्याचे कबुल केल्याने त्याचेकडुन अशा एकूण ०३ मोसा किंमती ८२,०००/—रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बुट्टीबोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. ह्रदयनारायण यादव गठीत विशेष पथकातील अधिकारी सपोनी प्रशांत लभाणे, पोहवा आशिष टेकाम, पोहवा युनूस खान, पोहवा कृणाल पारधी, पोशि दशरथ घुगरे, आशिष कछवाह व माधव गुट्टे यांनी कामगिरी पार पाडली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कृणाल पारधी पोस्टे बुट्टीबोरी हे करीत आहे.



Scanned with OKEN Scanner

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर